
बीड । शुक्रवार
१४.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३३५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955




# 'दादा खिंडकर वाल्मीक कराडपेक्षा मोठा गुंड'

## 'मुंडेंनी सपोर्ट केला नसता तर...'; धनंजय देशमुख यांच्या साडूवर गंभीर आरोप!

**बीड । प्रतिनिधी**

धनंजय देशमुख यांचे साडू दादा खिंडकर याने ज्यांच्या गाडीवर आणि घरावर हल्ला केला होता, त्या ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते पत्रकार परिषद घेऊन टीका केली आहे.

परमेश्वर सातपुते हे ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख आहेत. २०२०-२१ मध्ये सातपुते यांच्या बीडमधील राहत्या घरावर आणि त्यांच्या गाडीची तोडफोड केली होती. अशातच पत्रकार परिषद घेऊन धनंजय देशमुख यांच्या साडूवर गंभीर आरोप केले आहेत. तसेच धनंजय मुंडे यांचा हात दादा खिंडकर याच्या डोक्यावर होता, असा आरोप देखील परमेश्वर सातपुते यांनी केला आहे.

दादा खिंडकर वाल्मीकपेक्षा मोठा गुंड परमेश्वर सातपुते- राष्ट्रवादीचे नेते अमरसिंह पंडित यांच्या जीवावर दादा खिंडकर याने आतापर्यंत दादागिरी केली. दादा खिंडकर वाल्मीक कराड याच्यापेक्षा मोठा गुंड आहे. गावात खूप मोठी दहशत आहे. दादा खिंडकर टोळी चालवतो. बेलवाडी गावात मतदानाचा अधिकार नाही. स्वतः बटण दाबतात आणि फक्त बोटाता सही लावली जाते. नाहीतर जीवे मारण्याची धमकी दिली जाते, असा आरोप परमेश्र्वर सातपुते यांनी केला आहे.

दादा खिंडकरचे आका कोण?- माझ्या घरावर दादा खिंडकर यांनी हल्ला केला. घराच्या दाराच्या कड्या लावल्या म्हणून वाचलो होतो. आरोपीला अटक केली नाहीं म्हणून त्याची मुजोरी वाढली. दादा खिंडकर याने ग्रामपंचायत बोगस कामं करुन पैशे कम ावते. दादा खिंडकर याच्यावर मोका लावला जावा, अशी मागणी देखील परमेश्वर सातपुते यांनी केली आहे. दादा खिंडकरचे आका राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे नेते अमरसिंह पंडित आहेत. त्यांनी चार गुन्हे दाखल करू दिले नाहीत, असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

धनंजय मुंडे यांनी सपोर्ट केला नसता तर.- राष्ट्रवादीचे नेते अमरसिंह पंडित यांच्या जीवावर दादा खिंडकर याने आतापर्यंत दादागिरी केली. दादा खिंडकर याचा तडीपाडीचा प्रस्ताव त्यांनीच रोखला. अमरसिंह पंडित यांनी त्याला थोडं बाजूला केलं आहे. अमरसिंह पंडित आणि धनंजय मुंडे यांनी सपोर्ट केला नसता तर दादा खिंडकर जेल मध्ये असता. दादा खिंडकर याला वाचवण्यासाठी पोलीस स्टेशनला नेत्याने कॉल केले होते, असा आरोप देखील परमेश्र्वर सातपुते यांनी केला आहे.

दादा खिंडकरची हत्या झाली असती... परम ेश्र्वर सातपुते- दरम्यान, मी पोलीस आणि कोर्टात न्याय मागितला पण मला न्याय मिळाला नाही. साक्षीदार याच्यावर दबाव टाकतात. गुन्हेगारी लपविण्यासाठी दादा खिंडकर धनंजय देशमुख यांच्या सोबत फिरतात. दादा खिंडकर यांची संतोष देशमुख यांच्यापेक्षा गंभीर हत्या झाली असती पण मी रोखली, असं वक्तव्य देखील परमेश्र्वर सातपुते यांनी केलंय.

# हातपाय तोडले, मुंडकं छाटलं,

## पुण्यात नदीपात्रात आढळला खांडोळी केलेला मृतदेह

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील दानेवाडी गावच्या घोडनदीत पुरुष जातीचा एक मृतदेह आढळल्याची घटना उघडकीस आली आहे. अत्यंत अमानुषपणे ही हत्या करून अज्ञातांनी हा मृतदेह याठिकाणी टाकल्याचं समोर आलं आहे.

मृतदेहाचे हात पाय तोडून, मुंडकं छाटून अक्षरश: खांडोळी केलेल्या अवस्थेत हा मृतदेह आढळून आला आहे. हा मृतदेह सापडल्यानंतर गावात तणाव निर्माण झाला आहे. या प्रकरणी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला असून म रेकऱ्यांचा शोध घेतला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे जिल्ह्याच्या शिरूर घोडनदी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ९ मार्च २०२५ रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर



# बीड मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल; दादासाहेब खिंडकर पोलिसांना शरण

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या पिंपळनेर पोलीस ठाण्यात दादासाहेब खिंडकर (ऊवरीरहशल घहळपवङरी) यांच्यावर अमानुष मारहाण करणे आणि अपहरण प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आज सकाळी खिंडकर हा बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात शरण आला.



दादासाहेब खिंडकर याचा एक जूना व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्यात ओमकार सातपुते याला खिंडकर मारहाण करत असल्याचे दिसते. या व्हिडिओतून अमानुष पद्धतीने मारहाण केल्याचे समोर आले. ओमकार सातपुते हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा चुलत भाऊ आहे. या प्रकरणी खिंडकर याच्यावर पिंपळनेर पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर त्याच्या शोधासाठी पोलिसांनी पथक रवाना केले होते. यादरम्यान आज सकाळी साडेदहा वाजता तो बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात शरण आला. यानंतर त्याला पिंपळनेर पोलिसांनी ताब्यात घेत आता पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे.

# सातत्याने मारहाणीचे व्हिडिओ का समोर येत आहेत? जरांगे-पाटलांनी सांगितले राजकारण

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार प्रकाश सोळंके, मराठा नेते, मनोज जरांगे-पाटील यांनी आवाज उठला आहे. त्याच धस, क्षीरसागर, सोळंके आणि जरांगे-पाटील यांच्या जवळील कार्यकर्त्यांनी किंवा व्यक्तींनी दुसऱ्यांना मारहाण केल्याचे सांगत व्हिडिओ समोर येत आहेत.




पण, संतोष देशमुख हत्या प्रकरणावरील लक्ष हटवण्यासाठी एकमेकांचे व्हिडिओ समोर आणले जात आहे, असा आरोप मराठा नेते, मनोज जरांगे-पाटील यांनी केला आहे. ते प्रसारमाध्यम ांशी संवाद साधत होते. जरांगे-पाटील म्हणाले, राजकीय लोक जर एखाद्या प्रश्नामध्ये घुसले तर सामजिक प्रश्न सोडवण्यासाठी आमच्या सारख्या माणसांना अडचणी निर्माण होतात. हे लोकं मॅटर दाबण्यासाठी आतून ही व्हिडिओ बाहेर काढण्याची शाळा खेळू शकतात. मी तुझा व्हिडिओ दाखवतो, तू माझा व्हिडिओ दाखव, आता हे सुरू झाले आहे. थोड्या दिवसांत अनेकांचे व्हिडिओ समोर आणले जातील. कार्यकर्त्यांचे व्हिडिओ काढून राजकीय डाव टाकला जात आहे.

महायुतीची सत्ता येऊन चार आणि तर मी उपोषण सोडून एक महिना उलटून गेला आहे. आता ते काय करतो हे आम्ही बघत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठा समाजाला आरक्षण देणार असल्याने आम्ही शांत आहोत. तुम्ही असे समजायचे नाही मग की आम्ही शांत आहोत म्हणजे तुम्ही आमची फसवणूक करणार तर आम्ही तुम्हाला वठणीवर आणू, असा इशारा जरांगे- पाटलांनी सरकारला दिला आहे.

सरकारने अर्थसंकल्पात शेतकऱ्यांनाही काही दिले नाही. कर्जमाफी नाही किंवा कर्जमुक्तीही नाही. त्यांनी गोरगरिबांच्या आरक्षणाचा प्रश्नही मार्गी काढला नाही. म्हणजे सरकारने केवळ गोड बोलून जनतेची मान कापली. त्यामुळे इथून पुढे कमी सांगायचे, कमी बोलायचे व अचानक आंदोलन करायचे या भूमिकेशिवाय सरकार आता ठिकाण्यावर येणार नाही. सरकारकडे जसा कावा आहे, तसा गरिबांकडेही आहे, असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

# शिक्षिकेच्या घरात १२ वीच्या उत्तरपत्रिका जळाल्या, विरारमध्ये प्राचार्यांवर गुन्हा दाखल

**पालघर । प्रतिनिधी**

बारावीच्या उत्तरपत्रिका जळाल्या प्रकरणी विरारमधील प्राचार्य आणि शिक्षकांवर बोळींज पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उत्तरपत्रिका घरी नेण्याची परवानगी नसतानाही बेकायदेशीररित्या या उत्तरपत्रिका घरी ▶▶ उर्वरित पान २ वर

दैनिक मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे (मो. ९८२२१५२९५५)




वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

## चौथा वर्धापन दिन

सर्वांना नमस्कार, ! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.




# SP नवनीत काँवत यांचा सर्वात मोठा निर्णय!

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत्या गुन्हेगारीमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि पोलिस दलाच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्यासाठी बीडचे नवे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार, आता बीडमधील सर्व पोलिस कर्मचाऱ्यांच्या नेमप्लेटवरून आडनाव हटवले जाणार आहे. या निर्णयानुसार, पोलीस अधीक्षकांपासून ते कॉन्स्टेबलपर्यंत सर्व अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या छातीवरील व टेबलावरील नेमप्लेटवर केवळ नाव असणार आहे. यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याची ओळख ▶▶ उर्वरित पान २ वर



# असे १० ठिकाण जिथे तुमच्या होळी सणाचा आनंद होईल द्विगुणित, नक्की जा अन् मनसोक्त अनुभवा!

होळी हा रंगांचा सण. जो १४ मार्च रोजी मोठ्या थाटामाटात साजरा केला जाईल. हा सण देशभरात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. ज्यामुळे हा सण खास बनतो. जर तुम्हाला नेहमीप्रमाणे एकाच ठिकाणी होळी साजरी करण्याचा कंटाळा आला असेल, तर यावेळी अशा काही ठिकाणी जा जिथे होळी केवळ खेळली जात नाही तर अविस्मरणीय ठरेल.

उदयपूरची होळी

राजस्थानमध्ये सर्व रंग दिसतात, म्हणून येथील होळी खूप खास आहे. विशेषतः उदयपूरचे. उदयपूरला तलावांचे शहर म्हटले जाते आणि येथील हवेत एक वेगळीच जादू आहे. येथे लोक मानेक चौकापासून सिटी पॅलेसपर्यंत पोहोचतात. खरं तर, या प्रसंगी, ढोल–ताशांच्या गजरात आणि रंगीबेरंगी गुलालाच्या उधळणीसह हत्ती आणि घोड्यांची शाही मिरवणूक काढली जाते.

केरळ

खरंतर हा कार्यक्रम मेवाड कुटुंबाने आयोजित केला आहे. येथे होळीच्या एक दिवस आधी होलिका दहन केले जाते जेणेकरून सर्व वाईट गोष्टींचा अंत होईल. तर बसनवाड्यात लोक या दिवशी एकमेकांवर दगडफेक करतात आणि होलिका दहनाच्या राखेवर चालतात.

युपीची बरसाना होळी

उत्तर प्रदेशातील बरसाना येथील लाठमार होळी किंवा मथुरेच्या मटकी फोडण्याच्या होळीबद्दल तुम्ही नेहमीच ऐकले असेल,या



ठिकाणी देखील तुम्ही होळीचा आनंद द्विगुणित करू शकता. तशीच विविध राज्यात देखील होळी सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

उत्तराखंडची खडी होळी विशेष

उत्तराखंडमधील खडी होळीबद्दल ऐकले आहे का? कुमाऊँमध्ये हा उत्सव साजरा केला जातो. याला बैथक असेही म्हणतात. या प्रसंगी, उत्तराखंडमधील पुरुष चुडीदार, टोकदार टोपी आणि कुर्ता पायजमा असे पारंपारिक पोशाख घालतात. ते एकत्र बसून लोकगीते गातात. हा उत्सव २ महिने चालतो. येथे फुलांची पाने, राख, रस आणि पाण्यापासून नैसर्गिक रंग बनवले जातात.

पंजाबचा होळी मोहल्ला

पंजाबमध्ये, होळीच्या दिवशी, निहंग सरदार आनंदपूर साहिबमध्ये स्टंट करून होला मोहल्लाचा सण साजरा करतात. या काळात, शहरातील सर्व लोक हे पराक्रम पाहण्यासाठी जमतात. हे दृश्य खूप अद्भुत आहे. या वेळी, गुलाल देखील हवेत फेकला जातो.

मणिपूरची रासगंगा होळी खास

मणिपूरची रसगंगा होळी खूप खास आहे. हा सण होळीच्या ६ दिवस आधी सुरू होतो. यामध्ये मणिपूरची सांस्कृतिक झलक पाहता येते. या काळात, पुरुष ढोल वाजवत मुक्तपणे नाचतात. या वेळी शेकोटी देखील पेटवली जाते आणि लोक एकमेकांवर रंग लावतात. शेवटी, होळीच्या दिवशी, लोक कृष्ण मंदिरात दर्शनासाठी पोहोचतात आणि तिथेही पारंपारिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

हिमाचलमधील सांगलाची होळी

हिमाचल प्रदेशातील किन्नौर जिल्ह्यात सांगला नावाचे एक ठिकाण आहे जिथे होळी ३ दिवस साजरी केली जाते. येथे लोक बरींगनागच्या मंदिरात किन्नौरी नाटक सादर करतात. येथे गटागट फिरतात आणि सर्वांना गुलाल लावतात. या काळात, हे गट सर्व बाजारपेठांमधून जातात आणि मंदिरात पोहोचतात आणि होलिका दहन करतात. होळीच्या दिवशी सर्वजण मंदिरात एकत्र जेवतात.

# होळीला जबरदस्तीने रंग लावल्यास पोलिस ठाण्यात बेरंग होणार!

## आडवून दमदाटी करणाऱ्यांनो पहिल्यांदा कायदा समजून घ्या

होळीला जबरदस्तीने रंग लावल्यास पोलिस ठाण्यात बेरंग होणार! आडवून दमदाटी करणाऱ्यांनो पहिल्यांदा कायदा समजून घ्या. हा आनंदाचा, रंगांचा आणि आपुलकीचा आहे. आज म्हणजेच १४ मार्च रोजी देशभरात होळी साजरी होणार आहे. होळीच्या दिवशी संपूर्ण देश वेगवेगळ्या रंगात रंगणार आहे. रस्ते, गल्ल्या, सर्व रंगांनी रंगवलेली दिसून येतील. या दिवशी, लोक होळीचा सण त्यांच्या कुटुंबियांसह, मित्र आणि परिचितांसह मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करतात. एकमेकांवर रंग आणि गुलाल उधळला जातो. मात्र, काही ठिकाणी लोक अनोळखी व्यक्तींवर रंग फेकत असल्याचेही दिसून येते. अनेक वेळा रस्त्यावरून जाणाऱ्यांना रंग लावण्याची सक्ती केली जाते. तुम्हालाही कोणालाही जबरदस्तीने रंग लावण्याची आवड असेल तर. मग सावध राहा. कारण असं




करणाऱ्यांना त्याची शिक्षा मिळू शकते, याबाबत काय निय आहेत, ते जाणून घ्या सविस्तर.

पाण्याचे फुगे फेकले तर..– रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांवर लोक रंग फेकत असल्याचे अनेकदा दिसून आले. त्यामुळे अनेकवेळा पाण्याचे फुगे लोकांवर फेकले जातात. पण असे केल्याने तुम्ही अडचणीत येऊ शकता. या कामासाठी तुम्हाला तुरुंगातही जावे लागू शकते. यासाठी काय नियम आहेत ते आम्ही तुम्हाला सांगतो. होळीच्या दिवशी कोणी पाण्याचा फुगा फेकत असेल तर त्याच्यावरतीही कारवाई होऊ शकते. यासाठी बीएनएसवर वेगवेगळ्या कलम ंतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो. अशा परिस्थितीत बीएनएस कलम १२०(१) अन्वये गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. कलम १२०(१) अन्वये जाणून बुजून दुखापत केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात पाठवले जाऊ शकते. यामुळे एक वर्षाचा तुरुंगवास होऊ शकतो. यासोबतच दहा हजार रुपयांपर्यंतचा दंडही होऊ शकतो किंवा दोन्ही शिक्षा भोगावी लागू शकते.

काय आहेत नियम? काय होऊ शकते शिक्षा?– कोणालाही जबरदस्तीने रंग लावल्यास तुमच्या अडचणी वाढू शकतात. बळजबरीने इतरांवर रंग लावल्यास तुम्ही तुरुंगात जाऊ शकता. याबाबत कोणते नियम बनवले आहेत ते आधीच जाणून घ्या. होळीच्या दिवशी बळजबरीने रंग लावून कोणाचे काही नुकसान होत असल्यास अशा परिस्थितीत तुम्हाला इछड च्या कलम १२५ अंतर्गत ५००० रुपये दंड भरावा लागू शकतो किंवा तुम्हाला १ वर्ष किंवा दोन्ही तुरुंगवास होऊ शकतो. जर कोणी महिलांना, तरूणींना जबरदस्तीने रंग लावत असल्यास मग बीएनएस कलम ७९ अंतर्गत महिलेच्या प्रतिष्ठेचा अपमान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. ज्यामध्ये ३ वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते आणि दंड आकारला जाऊ शकतो. होळीच्या दिवशी एखाद्याचा रस्ता अडवला जातो आणि त्याच्यावर जबरदस्तीने रंग टाकले जातात आणि त्रास दिला जातो. मग बीएनएस कलम ३४५ अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. ज्यामध्ये १ महिन्याची तुरुंगवास किंवा ५००० रुपये दंड होऊ शकतो. किंवा दोन्ही शिक्षा असू शकतात. एखाद्याला रंग लावण्याची सक्ती केली तर मारामारी आणि हाणामारी होते. मग अशा प्रकरणात बीएनएस कलम १५० अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. ज्यामध्ये १० वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे होळीवर रंग लावण्यापूर्वी या गोष्टी लक्षात ठेवा. आपल्या प्रियजनांसोबत होळी साजरी करा.

पान ४ वरून पुढे...

## लाडकी बहीण योजनेचा...

मतदानाच्या आधार वर सत्ता पण आली, पण प्रत्यक्षात गेले दोन महिन्याचे मानधनहि खात्यात जमा करण्यात सरकारला अपयश आले आहे आणि आश्वासन दिले २१०० रुपयाचे देउन प्रत्यक्षात १५०० रुपये मानधनच खात्यात जमा होत असल्याने महिलांची अपेक्षाभंग करण्यात आली आहे. तेव्हा आमची अशी मागणी आहे की, शासनाने चक्ति व आस्वानुसार २१०० रुपये मानधन त्वरित महिलांना लवकरात लवकर बँक खात्यावर जमा करण्यात यावे या मागणीसाठी बीड व गेवराई तहसील कार्यालयाला निवेदन देताना सर्कल प्रमुख आरती ताई थोरात, भिमाबाई घाडगे, मंदाबाई घाडगे, व मोठ्या संख्येने महिला शिवसैनिक उपस्थित होते.

## चुकीच्या आशयाचा...

कमी व्हावी तसेच माझे आर्थिक नुकसान व्हावे यासाठी टाकलेली आहे. करीता स्टोरी डॉट कॉम व 'राजकारण महाराष्ट्राचे' हे पेज जी व्यक्ती चालवते त्या व्यक्तीचा शोध घेवुन संबंधीत व्यक्तीविरुध्द व त्या पेज वर माझ्या विरुध्द माझी बदनामी होईल,मला मानसिक त्रास होईल,या उद्देशाने टाकलेली पोस्ट यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी.तसेच या पोस्ट वर अनेक लोकांनी बदनामी कारक व धमकी सारख्या कमेंट केलेल्या आहेत.या बदनामी कारक कमेंट टाकणाऱ्या व्यक्तींविरोधात देखील कायदेशीर कारवाई करण्यात येणे आवश्यक असल्याने माझे संबंधीत व्यक्ती विरोधात कायदेशीर पणे तक्रार असल्याचे पोलिसांना दिलेल्या अर्जात नमूद करण्यात आले आहे.त्याचबरोबर सरपंच राधेश्याम धस यांनी तक्रार अर्जासोबत संबंधित फेसबुक पेजचे स्क्रीन शॉट व विरोधात कमेंट करणाऱ्यांची नावे देखील सादर केली आहेत.

पान 1 वरून पुढे...

## हातपाय तोडले....

माऊली सतीश गव्हाणे नावाच्या १९ वर्षीय तरुणाची हरवल्पाची नोंद झाली होती. हा तरुण शिरूर तालुक्याच्या जवळील आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील दानेवाडी गावचा रहिवासी असून तो शिरूर येथील सीटी बोरा महविद्यालयात इयत्ता बारावीच्या वर्गात शिकत होता. सध्या त्याची बोर्डाची परीक्षा सुरू होती. ९ मार्चला तो अचानक बेपत्ता झाला. या प्रकरणी कुटुंबीयांनी तक्रार दाखल केली. पण त्याचा काहीच थांगपत्ता लागला नाही. दरम्यान, बुधवारी १२ मार्चला दानेवाडी गावच्या घोडनदी पात्रातील एका विहिरीत एका अनोळखी पुरुषाचे प्रेत पोत्यात भरून टाकलेलं आढळून आलं आहे. त्या पुरुष जातीच्या प्रेताचे दोन्ही हात, दोन्ही पाय, मुंडके छाटलेले आहे. पूर्ण खांडोळी केलेले प्रेत आढळल्याने सर्वत्र संतापाची लाट असून हा मृतदेह ९ तारखेला बेपत्ता झालेल्या माऊलाचा असल्याचा अंदाज व्यक्त केला जातोय.

हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर मिसिंग तरुणाच्या घरच्यांसह शेकडो नातेवाईकांनी शिरूर पोलीस स्टेशन गाठलं. कदाचित हे प्रेत आपल्याच मुलाचे आहे की काय ? अशी शंका या सर्वांना असून, त्याचे मुंडके प्रेतासोबत नसल्याने ते प्रेत माऊलीचेच आहे की नाही? याची खात्री कुणालाच पटत नाहीये. पण माऊलीच्या वर्णनासारखाच हा मृतदेह असल्याचं अनेकजण सांगत आहेत. त्यामुळे गावात तणाव वाढला आहे. या अनोळखी प्रेताच्या चौकशीसाठी अहिल्यानगर व पुणे ग्रामीण पोलिसांची पथके तपासाला लागलेली असल्याचे, शिरूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोते व पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी

पान 1 वरून पुढे...

सांगितलं. या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## SP नवनीत कॉंवत...

त्याच्या आडनावावरून न होता, फक्त नावाने होणार आहे. प्रशासनाच्या मते, यामुळे पोलीस दल अधिक तटस्थ आणि समान दृष्टिकोन ठेवून काम करू शकेल.

पोलीस दलात जात, धर्म किंवा पार्श्वभूमीवर आधारित कोणताही भेदभाव नसावा, या उद्देशाने हा निर्णय घेतला गेला आहे. अनेकदा लोक आडनावावरून पोलीस अधिकाऱ्यांबद्दल वेगवेगळी मते तयार करतात, त्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या कामावर होऊ शकतो. नेमप्लेटवर फक्त नाव ठेवण्याचा निर्णय हा सामाजिक सलोखा आणि एकसंधता कायम ठेवण्यासाठी महत्त्वाचा पाऊल मानला जात आहे.

या निर्णयामुळे पोलिसांचे काम अधिक पारदर्शक होईल आणि नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास वाढेल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे. सर्वसामान्य नागरिकांना पोलिस अधिकाऱ्यांचा दर्जा, त्यांचे कौटुंबिक पार्श्वभूमी यापेक्षा त्यांचे काम महत्त्वाचे वाटले पाहिजे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यात हा निर्णय लागू झाल्यानंतर इतर जिल्ह्यांमध्येही अशा प्रकारची व्यवस्था लागू करता येईल का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्र पोलीस दलात हा निर्णय आदर्शवत ठरू शकतो. अनेक सामाजिक संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, जात आणि भेदभावमुक्त प्रशासनाचा आदर्श तयार होईल, असे मत व्यक्त केले आहे. पोलीस दलाची ओळख त्यांच्या कार्यक्षमतेवर असावी, जातीवर नाही, हा संदेश

पान 1 वरून पुढे...

देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. यामुळे कायदा आणि सुव्यवस्था अधिक चांगल्या प्रकारे राखण्यास मदत होईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## शिक्षिकेच्या घरात....

नेण्यात आल्याचा ठपका ठेवत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बारावी कॉमर्सच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स या विषयाच्या १७५ उत्तरपत्रिका जळाल्या होत्या.

विरार मध्ये १२ वी कॉमर्सच्या तपासणीसाठी आलेल्या उत्तरपत्रिका शिक्षिकेच्या घरी जळल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. विरारच्या नानाभात या परिसरात राहणाऱ्या प्रिया रोड्रिक्स या शिक्षिकेच्या घरी ही घटना घडली. उत्तर पत्रिका जळाल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ही घटना उघडकीस आली. याबाबत बोळींज पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. जळालेल्या उत्तरपत्रिका पोलिसांनी ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला.

१७५ उत्तरपत्रिका जळाल्या

बारावी कॉमर्सच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स या विषयाच्या एकूण ३०० उत्तरपत्रिका शिक्षिकेने तपासणीसाठी घरी नेल्या होत्या. घरात अचानक आग लागली आणि या आगीत संपूर्ण उत्तरपत्रिकांचा गठ्ठा जळून खाक झाला. त्यामध्ये १७५ उत्तरपत्रिका जळाल्या. ही घटना १० मार्च रोजी विरार पश्चिमेच्या बोळींज नानभाट रोड येथील गंगुबाई अपार्टमेंटमध्ये घडली होती.

या प्रकरणी महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक बोर्डाच्या विभागीय

पान 1 वरून पुढे...

सचिव ज्योत्स्ना शिंदे यांनी विरारच्या बोळींज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. शासनाचा प्रतिनिधी म्हणून जोत्स्ना शिंदे यांनी तक्रार केली. त्यांच्यासोबत ज्योत्स्ना शिंदे यांच्या सोबत पालघरच्या माध्यमिक विभागाच्या जिल्हा शिक्षण अधिकारी संगिता भागवत याही सोबत होत्या. ज्या शिक्षकाच्या घरी बारावीच्या उत्तरपत्रिका जळाल्या, त्या शिक्षिकेलाही पोलिस ठाण्यात बोलावण्यात आलं होतं. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

शिक्षिकेवर योग्य ती कारवाई व्हावी

बारावीच्या उत्तरपत्रिका शाळेतच तपासणे बंधनकारक असताना त्या शिक्षिकेने उत्तरपत्रिका घरी कशा नेल्या? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. शिक्षण मंडळाच्या नियमानुसार, परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका सुरक्षित पद्धतीने शाळेतच तपासण्याचे निर्देश असतात. त्यामुळे या शिक्षिकेने उत्तरपत्रिका घरी का नेल्या असा प्रश्न विचारण्यात येतोय. उत्तरपत्रिका जळल्याने अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास जलदगतीने करण्यात यावा, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही

जळालेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी करून त्याचे गुणदान झाले असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. कारण गुणदान केलेला कागद सुरक्षित आहे अशी माहिती आहे. आत्पकालीन परिस्थिती आल्यास उत्तरपत्रिका नष्ट झाली असल्यास इतर विषयांच्या गुणांची सरासरी काढून संबंधित विषयाचे गुण देण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत नाही.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# धाराशिव जिल्ह्यातील पथदर्शी कामाचा आदर्श घ्यावा : विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**▸ ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या पुरस्काराचे वितरण**

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

धाराशिव जिल्हयाने टीमवर्कच्या माध्यमातून विविध क्षेत्रात चांगले काम केले आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील इतर जिल्हयांनीही धाराशिव जिल्ह्यातील पथदर्शी कामाचा आदर्श घ्यावा, आपल्या जिल्हयातही पथदर्शी कामे यशस्वी करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२२-२३ अंतर्गत या वर्षातील विभागस्तरीय पुरस्काराचे वितरण विभागीय आयुक्त श्री. गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी




महावितरणचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, अपर आयुक्त के.आर.परदेशी, उपायुक्त सुरेश बेदमुथा, डॉ. सीमा जगताप आदी उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री. गावडे म्हणाले, धाराशिव जिल्हा शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत नेहमीच अग्रेसर राहीला आहे. गुड गर्व्हनर्नसमध्ये जिल्ह्याने पथदर्शी काम केले आहे. जिल्हा प्रशासनाने टीम वर्कच्या माध्यमातून विविध क्षेत्रात चांगले काम केले आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील इतर जिल्हयांनीही धाराशिवच्या पथदर्शी काम ाचा आदर्श घेत आपल्या जिल्हयातही पथदर्शी काम उभे करावे, असे आवाहन त्यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर विभागात पंचायतराज व्यवस्थेत चांगल्या पध्दतीने काम सुरू आहे. स्वच्छता व पर्यावरण क्षेत्रात कामाची गरज असून यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे. पर्यावरणाचा समतोल जपला गेला पाहीजे व गावशिवारात हिरवाई जपण्यासोबतच पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्येक घटकाने वृक्षारोपणासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान २०२२-२३ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी म हाराज स्वच्छ ग्राम प्रथम क्रमांकाचा पुरस्कार ग्रामपंचायत, जकेकूरवाडी, ता.उमरगा, जि.धाराशिव रू. १२ लक्ष, द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार ग्रामपंचायत, दुधड, ता.जि.छत्रपती संभाजीनगर रू. ९ लक्ष, तृतीय क्रमांकाचा पुरस्कार ग्रामपंचायत, चौंढी शहापूर, ता.औंढा, जि.हिंगोली रू.७ लक्ष. विशेष पुरस्कार स्व.वसंतराव नाईक पुरस्कार सांडपाणी व्यवस्थापन रु.७५ हजार ग्रामपंचायत, जवळगाव, ता.हिमायतनगर, जि.नांदेड, विशेष पुरस्कार डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार पाणी गुणवत्ता रु.७५ हजार सिकंदरपूर, ता.जि. लातूर, विशेष पुरस्कार स्व.आबासाहेब खेडकर पुरस्कार शौचालय रु.७५ हजार ग्रामपंचायत, रामपूरी बु. ता.मानवत, जि.परभणी या सर्वांना धनादेश व प्रमाणपत्र यांचे विभागीय आयुक्त श्री. गावडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त सुरेश बेदमुथा यांनी करुन आभार मानले. हे पुरस्कार स्वीकारण्यासाठी सरपंच आणि महिला प्रतिनिधी यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.

## राज्याचा धरणसाठा होळीदिवशी ५३.४१ टक्क्यांवर; जायकवाडीसह उर्वरित धरणात काय स्थिती?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात सध्या तापमानाचा भडका उडाला आहे. बहुतांश ठिकाणी ३६ अंश सेल्सियस होऊन अधिक तापमानाची नोंद होत आहे. होळीपासून राज्यात खऱ्या अर्थाने उन्हाळ्याला सुरुवात होते. आत्तापासूनच ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पाणीटंचाईला सामोरे जावं लागतंय. होळीदिवशी (१३ मार्च) राज्यातील धरणांमध्ये सरासरी ५३ .४१% .पाणीसाठा शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाने सांगितलंय . मागील वर्षीच्या तुलनेत साधारणतः १०% पाणीसाठा अधिक असल्याचंही नोंदवण्यात आलंय .

गेल्यावर्षी सरासरी होऊन कमी पाऊस, अवकाळी पावसाचा फटका, प्रचंड तापमान आणि हवामानातल्या टोकाच्या बदलांनी




अनेक धरण साठे शून्यावर गेले होते .त्यानंतर हळूहळू पाणीसाठा वाढत गेला. दरम्यान,उन्हाळ्याच्या तोंडावर धरणांमध्ये किती पाणी आहे ? पाहूया सविस्तर ..

राज्यात लघु मध्यम आणि म ोठ्या अशा २९९७ धरण प्रकल्पांम ध्ये होळीच्या दिवशी ( १३ मार्च) ५३.४१% उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे .नागपूर व अमरावती विभागात ४९.३०%,५७.८८% पाणीसाठा आहे .मराठवाड्यातील ९२० धरणांमध्ये ५२ टक्के पाणी शिल्लक राहिले असून मागील वर्षी याच सुमारास मराठवाड्यात केवळ २३.५३% पाणीसाठा शिल्लक होता .नाशिकच्या ५३७ धरणांमध्ये आज ५३.६८% पाणी शिल्लक आहे .पुणे विभागातील धरणांमध्ये ५२.९७% तर कोकण विभागात ५८.१३% पाणीसाठा आहे .

मराठवाड्यातील हजारो नागरिकांची तहान भागवणारे जायकवाडी धरण सध्या ६३ टक्क्यांवर आहे . गेल्यावर्षी जायकवाडीत याच दिनांक २४.४४% पाणी शिल्लक होतं .पुण्यातील डिंभे धरण ४५.३६% भाटघर ६१.५५% तर खडकवासला ६९ टक्क्यांवर आहे .मागील वर्षी यात सुमारास शून्यावर असलेले उजनी सध्या ४३.२९ टक्क्यांवर आहे असे जलसंपदा विभागाने सांगितले .धाराशिव चे निम्न तेरणा मागील वर्षी ५.५३ टक्क्यांनी भरले होते आता तेरणात ७४.०२% पाणीसाठा शिल्लक आहे .नाशिकच्या गंगापूर धरणात ७२.५३% गिरणा धरणात ४२.९६% तर भाम धरण ४६.८५% भरले आहे.

## कऱ्हेवडगावच्या शिरपेचात मानाचा तुरा, उल्लेखनीय कामगिरीबद्दल सरपंच वंदना गायकवाड यांना राज्यस्तरीय आदर्श महिला सरपंच पुरस्कार प्रदान

**आष्टी । प्रतिनिधी**

गावात ग्रामपंचायतच्या माध्यमातून भरघोस निधी आणून वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते यासह विविध समाजोपयोगी सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी गावचे प्रथम नागरिक अर्थात सरपंच यांच्याकडे असते. कऱ्हेवडगावच्या सरपंच वंदना परिवंत गायकवाड यांनी गावात मागील चार वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास हाती घेऊन म ोठ्याप्रमाणावर विकासाची कामे म ार्गी लावले आहेत.त्याबद्दल आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमि त्त राज्यस्तरीय आदर्श महिला सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गेल्या सहा वर्षापासून जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय




कामगिरी करणाऱ्या महिलांना नारी सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करत आहे. यामध्ये ग्रामीण भागात विकासाची धुरा समर्थपणे सांभाळणाऱ्या महिला सरपंचांचा विशेष सन्मान करण्यात येतो. आष्टी तालुक्यातील गव्हर्मे ट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड यांच्या पत्नी वंदना गायकवाड या कऱ्हेवडगावच्या विद्यमान सरपंच आहेत. तसेच त्या कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदावर कार्यरत आहेत. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते, कर्तव्यदक्ष आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली गावामध्ये अनेक विकासाची कामे मार्गी लावले आहेत. अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. त्या विविध समाज उपयोगी उपक्रम नेहमीच राबवत असतात. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत पंचायत समितीच्या सभागृहामध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा या कार्यक्रमामध्ये सौ प्राजक्ताताई सुरेश धस यांच्या हस्ते त्यांना राज्यस्तरीय आदर्श महिला सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी नजीमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेलेकर, गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव, यांच्या सह आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित होते.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड मध्ये रविवार दि १६ मार्च रोजी ११ ते २ आस्थीरोग तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी म हाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रविवार दि १६ मार्च रोजी ११ ते २ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे. या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इन्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फ ुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात आस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत.

## टेनिस बॉल क्रिकेटच्या जिल्हास्तरीय निवड चाचणीचे १६ मार्च रोजी आयोजन

**टेनिस बॉल क्रिकेटचे महाराष्ट्रातील ६० खेळाडू केंद्र शासनाच्या शासकीय नोकरी साठी पात्र**

**बीड । प्रतिनिधी**

टेनिस बॉल क्रिकेट या खेळाला २०२१ पासून स्पोर्ट्स अँड युथ अफेर्स गव्हरमेंट ऑफ इंडियाची मान्यता मिळालेली आहे. केंद्र शासनाच्या खेळाडू कोट्या मधील खेळाडूंना शासकीय सेवांमध्ये डायरेक्ट नियुक्ती केली जाते. इन्कम टॅक्स, पोस्ट ऑफिस, रेल्वे ई. अशा विविध ठिकाणी महाराष्ट्रातील ६० खेळाडू व भारतातील ३५० खेळाडूंना शासकीय नोकरी मिळाली आहे. अशा शासकीय नोकरीसाठी पात्र असणार्या खेळाच्या पुणे येथे होणार्या टेनिस बॉल क्रिकेटच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. १६ ते १८ एप्रिल दरम्यान पुणे येथे टेनिस बॉल क्रिकेटच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धा १४,१७,व सिनियर मुले / मुली या वयोगटात घेतल्या जाणार आहेत. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी बीड जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन यांच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी तेलगांव नाका बीड येथील टर्फ येथे रविवार दिनांक १६.०३.२०२५ रोजी घेतली जाणार आहे. या निवड चाचणीमध्ये सहभागी होणार्या खेळाडूंनी जिल्हा संघटनेकडे आधार कार्ड व रजिस्ट्रेशन फीस भरून नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. नाव नोंदणी झालेल्या खेळाडूंची सकाळी ८:०० ते १०:०० दरम्यान निवड चाचणी घेतली जाणार आहे. या निवड चाचणी मध्ये निवड झालेला जिल्हा संघ पुणे येथे होणार्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये राज्याचा संघ निवडला जाणार आहे. व तो निवडलेला संघ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा संघटनेचे सचिव रामदास गिरी मो.९८८११५९६०७ यांच्याशी संपर्क साधावा

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**श्री. आर.आर. जाधव ४ ये सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क. २२२ / २०२५ गिताबाई व ईतर ११ वि. निरंक**
**(मार्फत अँड. बी. एम. मुळे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे गणेश पि. तुळशिराम कार्ले, मौजे रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक ०९/०३/२०१६ रोजी मौजे मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) गिताबाई भ्र तुळशिराम कार्ले, वय ८० वर्ष धंदा घरकाम, रामादळमोही, ता गेवराई, जि. बीड, २) शोभा भ्र. गणेश कार्ले, वय ५० वर्षे धंदा मरकाम, रा. मादळमोही, ता गेवराई जि.बीड ३) प्रकाश पि.गणेश कार्ले, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड ४) आशाबाई भ्र. सुरेश चव्हाण, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. टाकरवण, ता. गेवराई, जि. बीड ५) स्वाती भ्र.संतोष नवले, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. भडंगवाडी, ता. गेवराई, जि. बीड. ६) रमेश पि.तुळशीराम कार्ले, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही, ता.गेवराई, जि. बीड.७) दिलीप पि.तुळशीराम कार्ले, वय ५० वर्षे, बंदा शेती, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि.बीड ८) प्रयागबाई किसन कार्ले, वय ६० वर्षे, धंदा घरकाम. रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड. ९) गंगा भ्र. अरुण पवार, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. मादळमोही, ता गवराई, जि. बीड १०) अनिता भ्र. नागनाथ तकीक, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. मादळमोही, ना गेवराई, जि. बीड ११) संगिता भ्र अरूण गायकवाड, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. जोडवाडा, ता. शिरूर कासार, जि. बीड. १२) रूक्मीण भ्र. शंकर जाधव, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. शहागड, ना अंबड, जि. जालना.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शावीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत नामे गणेश पि.तुळशिराम कार्ले, मौजे रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १०/०३/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २५/०४/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

# लिंबागणेश येथे महाबोधी विहार मुक्तीसाठी निदर्शने

**महाबोधी बौद्ध विहार कायदा 1949 रद्द करून बौद्ध विहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्ध भिक्खुंच्या ताब्यात द्यावे : डॉ.गणेश ढवळे**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध विहार कायदा बीटीएम सी अक्ट १९४९ रद्द करून महाबोधी बौद्ध विहाराचे संपूर्ण नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्ध भिक्खुंच्या ताब्यात देण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१३ गुरूवार रोजी सकाळी पंचशील नगर येथे तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून गावातील प्रमुख चौकातुन घोषणाबाजी करत रॅली काढण्यात आली.

गावच्या मुख्य प्रवेशद्वारात



निदर्शने करण्यात आली. बिहार मधील महाबोधी बौद्ध विहार जागतिक वारसा स्थान म्हणून ओळखले जाते. शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पुर्णज्ञान (संबोधी /बुद्धत्व ) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध बनले व' बुद्ध 'म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले.तथागत गौतम बुद्धाला ज्या बोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली.तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे.त्यामुळे देशातील नव्हे तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खु आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात.म ात्र आजही या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात



नाही. तेथील बौद्ध विहाराचा ताबा सनातन ब्राह्मणांच्या ताब्यात असून ज्या रुढी परंपरांना गौतम बुद्धांनी नाकारले तीच कर्मकांडे येथे सुरू आहेत.बिहार येथील बौद्धगया महाबोधी महाविहार कायदा बीटीएमसी ऍक्ट १९४९ त्वरित रद्द करून सदरील बौद्ध विहार बौद्ध भिकूंच्या ताब्यात देण्यात यावे. बिहार राज्यात उपरोक्त कायद्याप्रमाणे बौद्धगया येथील महाबोधी महाविहार यांचे संपूर्ण व्यवस्थापन ब्राह्मण पुजाऱ्याकडे असून हा कायदा १९४९ मध्ये बिहार राज्य अंतर्गत स्थापित झालेला असून संविधानिक अधिकारानुसार (अनुच्छेद २५ आणि २६ )प्रमाणे आणि संविधानाच्या अनुच्छेद १३ विरोधात आहे हा विरोधाभास संपुष्टात आणून संविधानाचे बुज राखून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध भिकूंच्या ताब्यात देण्यात यावे. अशी म ागणी करण्यात आली.भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ,

,भिमराव जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव,राजाभाऊ गिरे ,बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ,श्रीहरी निर्मळ, अँड . गणेश वाणी,दादा गायकवाड,बीड उपजिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना आरूण निर्मळ, जितेंद्र निर्मळ, उमेश थोरात, दादा थोरात, नितीन थोरात, श्रीकांत आवसरे, नितिन निर्मळ, नाना निर्मळ, सिद्धार्थ निर्मळ, अमोल वक्ते , तुकाराम गायकवाड, प्रमोद निर्मळ, बबन सोनावणे, भालचंद्र गिरे, गणपत तागड, सचिन गिरे, आदि सहभागी होते.

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.१४ मार्च २०२५ पान ४

## नवतेजस्वीनी महोत्सवाचा समारोप १3 लाख ६० हजाराची उलाढाल

**बीड । प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागा अंतर्गत असणा-या महिला आर्थिक विकास महामंडळाचा सूवर्ण महोतसवी वर्धापन दिन आणि महिला दिनानिमित्त आयोजित ३ दिवशीय महिला बचत गटाव्दारे उत्पादित वस्तुंचे प्रदर्शन व विक्री अर्थात नवतेजस्वनी महोत्सवात १३ लाख ६० हजार रुपयांची उलाढाल झाली. येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यात जिल्हयातील एकूण ५२ बचतगटांनी आपल्या उत्पादनांचे स्टॉल लावले होते अशी माहिती माविम जिल्हा समन्वय अधिकारी एस.बी. चिंचोलकर यांनी दिली. या निमित्ताने महिला बचत गट उत्पादनांची मोठ्या प्रमाणावर उलाढाल झाली आणि यातुन त्यांना विक्रीसाठी उत्तम संधी माविमने प्राप्त करुन दिली.



*बीड: अमोल साळुंके यांनी महाराष्ट्र सेक्युरिटी फोर्स ट्रेनिंग मध्ये आज परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांचे धर्मवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाजीराव दादा चव्हाण साहेब व त्यांचे सर्व सहकारी व महेश साळुंके यांच्या वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छ दिल्या.*

### आठवडी बाजार असतानाही लिंबागणेश येथील ....

# प्राथमिक आरोग्य केंद्राला दिवसाच कुलुप; रुग्णांची हेळसांड

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर लिंबागणेश पंचक्रोशीतील १४-१५ गावातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोक आरोग्य सेवेच्या दृष्टीने अवलंबून आहेत. खाजगी दवाखान्याचा अवाजवी खर्च पेलु न शकणाऱ्या गोरगरीब रुग्णांना आधार वाटतो. मात्र वैद्यकीय अधिकारी यांच्या हलगर्जीपणामुळे



रूग्णांची हेळसांड झाल्याचे दिसून येत आहे. आज दि.१३ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील आठवडे बाजार असुनही दुपारीच प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय तपासणी कक्षाला कुलुप आढळून



आले. गावातील सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी २-३ वेळा वैद्यकीय अधिकारी यांना फोन केला परंतु उचलण्यात आले नाही. तिसऱ्यांदा केलेला फोन उचलल्यानंतर मी बघते ,सांगते असं उत्तर वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांनी बीडहुन निघाल्याचे सांगितले. याचवेळी ज्येष्ठ नेते जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या शाळेवरील कर्मचाऱ्यांने विक्रांत वाणी यांना फोन करून वैद्यकीय अधिकारी जयदत्त आण्णांच्या जवळच्या असुन विषय वाढवु नका, बातमी करू नका असा अनाहुत सल्ला दिल्याचे विक्रांत वाणी यांनी सांगितले. रूग्णांनी पत्रकारांना समस्या सांगताच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांने आकांडतांडव करत रूग्णांनाच ४ गोष्टी ऐकवल्या त्यामुळे रूग्णांचे नातेवाईक संतप्त झाले होते. प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेले भिवाबाई येडे, प्रमोद येडे, प्रमोद निर्मळ यांनी दवाखान्यात येऊन चिठ्ठी काढली आहे.परंतु डॉक्टरांचा पत्ताच नसल्याने नाराजी व्यक्त केली.

## लाडकी बहीण योजनेचा २१०० रुपये प्रमाणे हफ्ता द्या करिता शिवसेना महिला आघाडी चे तहसीलदारना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड व गेवराई तहसील कार्यालयात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धवजी साहेब यांच्या आदेशावरून मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब,शिवसेनेच्या उपनेत्या सुषमाताई साहेब अंधारे विशाखा ताई राऊत रंजना ताई नेवाले बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब महिला आघाडी बीड जिल्हा संपर्कप्रमुख



संपाताई गडकरी सहसंपर्कप्रमुख माजी आमदार बदाम आबा पंडीत यांच्या मार्गदर्शनाखाली महिला जिल्हाप्रमुख मीराताई नवले, उप जिल्हाप्रमुख राजाभाऊ मोहले जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्या नेतृत्वाखाली महाष्ट्रातल्या लाडक्या बहिणीना निवडणुकीमध्ये दर महीना २१०० रुपये चे आश्वासनाचे पालन न केले बाबत

वरील ज्या महिलेचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख पेक्षा कमी आहे अशा महिलांच्या उन्नतीसाठी हो योजना सरकारने सुरू केली. विधानसभा निवडणुकीत हे मानधन १५०० रुपयांवरून २१०० रुपये करणार असल्याचे आश्वासन दिलं गेल होत परंतु त्यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## योगतज्ञ श्रीमती राधा तांबे यांना जागतिक महिला दिनानिमित्त सेवा रत्न पुरस्कार जाहीर



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या जागतिक महिला दिनानिमित्त दिला जाणारा पद्मश्री सिंधुताई सपकाळ सेवा रत्न पुरस्कार सोहळा पार पडला. विविध क्षेत्रात अलौकिक कामगिरी करणाऱ्या नारीशक्तीला दरवर्षी सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. योग व निसर्गोपचार तज्ञ (उपचारात्मक योगा)आहार तज्ञ या क्षेत्रामध्ये अतिशय गौरव पूर्ण कामगिरी करणाऱ्या श्रीमती डॉ. राधा तांबे यांचा देखील यानिमित्ताने सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. नुकताच अंबड येथे झालेल्या प्रादेशिक मारवाडी युवा मंच तर्फे देखील जागतिक महिला दिनानिमित्त श्रीमती तांबे यांना *नारी रत्न* पुरस्काराने सन्मानित केले गेले. त्यानंतर त्यांना बीड जिल्ह्यातला नामांकित सेवा रत्न पुरस्कार जाहीर झाला. योग क्षेत्रात श्रीमती तांबे आपल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे जिल्ह्याभरात विख्यात आहेत. आजवर त्यांना सामाजिक योगदानाबद्दल विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले ही त्यांच्यासाठीच नव्हे तर बीड जिल्ह्यासाठी देखील गौरवाची बाब आहे. हा पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांनी पसायदान सेवा प्रकल्प (वंचितांचे हक्काचे घर)ढेकणमोह ता. जि.बीड या स्वयंसेवी संस्थेचे श्री.दराडे कुटुंब व श्रीमती विधाते ताई यांचे आभार मानले व पुढे देखील योगाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण आणि सशक्तीकरण करण्यात काही कसूर न ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.माता भगिनीने संघर्षावर मात करून परिस्थिती बदलली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

## थोडक्यात

### श्री मंगलनाथ मल्टीस्टेट, रोटरी क्लब व ईगलवूड इंग्लिश स्कूलच्या वतीने....

## महिला दिनानिमित्त माजलगाव मिसेस उपक्रमाचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरांमध्ये महिला दिनानिमित्त माजलगाव मिसेस हा प्रथमच



एक अनोखा उपक्रम दिनांक १६ मार्च २०२५ रोजी ईगलवूड इंग्लिश स्कूल फुले पिंपळगाव, माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेला आहे. स्त्री म्हणजे त्याग, प्रेम, कणखरपणा आणि प्रेरणा आहे तिचा गुणगौरव व्हावा, व त्यांच्या अंगी असलेले कला कौशल्य गुण व्यक्तिमत्व सादर करणे करिता एक मंच निर्माण व्हावा करिता या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून विजयी होणाऱ्या स्पर्धकास पैठणी साडीसह गृह उपयोगी वस्तूंचा संच त्याचबरोबर विविध आकर्षक पारितोषिके प्राप्त होणार आहेत. तरी रोटरी क्लब माजलगाव सिटी चे विद्यमान अध्यक्ष तथा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ॲड. रवींद्र कानडे, व ईगलवूड इंग्लिश स्कूल माजलगाव च्या अध्यक्षा व उपक्रम प्रमुखं सौ.अर्चना पवार यांनी माजलगाव शहर व परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी सहभाग नोंदवून या अनोख्या उपक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल उपवन संरक्षक अमोल सातपुते यांना रजत पदक



**बीड । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी बीड जिल्ह्यात वन अधिकारी म्हणून काम करतांना २०२० ते २१ मध्ये केलेल्या वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल राज्याच्या वन विभागाने रजत पदक जाहीर केले आहे. बीड जिल्ह्यात सन २०१६ ते २०२१ मध्ये जिल्हा वन अधिकारी म्हणून अमोल सातपुते हे कार्यरत होते. या काळात जिल्ह्यातील २७० एकर वन क्षेत्रातील अतिक्रमण हाटवुन येथे पुन्हा वनीकरण केले होते. त्याच बरोबर जिल्ह्यातील ५० ठिकाणच्या ११० एकर क्षेत्रात मियावाकी पध्दतीने घनदाट वनांची निर्मिती करून तेथील स्थानिक जैवविविधता संवर्धनाचा यशस्वी प्रयत्न केला होता. वृक्षारोपण संगोपनासाठी दुष्काळी बीड जिल्ह्यातील २७ ठिकाणी फिरत्या सौर ट्रॉली तंत्राचा वापर करून ग्रीन बेल्टची निर्मिती केली होती. त्याच बरोबर बीड जिल्ह्यातील वनक्षेत्रात वन्यजीवांसाठी ३ वर्षात १२० पाणवठे तयार केले व शिकारीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात प्रथमच कॅमेरा ट्रॅपचा वापर केला.वन विभागाकडून राज्यात वनसंपत्तीचे सरंक्षण व संवर्धनाचे काम प्रभावीपणे करणाऱ्या अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी व त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रोत्साहीत करण्यासाठी राज्यस्तरावरून पदके दिली जातात.या पदकासाठी सध्या जुन्नर येथे कार्यरत असलेले अमोल सातपुते यांची राज्यस्तरीय पदक निवड समितीने रजत पदकासाठी निवड केली आहे. या निवडीबद्दल उपवन संरक्षक अमोल सातपुते यांचे अभिनंदन होत आहे.

## चुकीच्या आशयाचा मजकुर फेसबुक पेजवर टाकुन मानहानी केल्याप्रकरणी आष्टी पोलिसात तक्रार दाखल

### जामगाव चे सरपंच राधेशाम धस यांनी केली तक्रार

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील जामगाव येथील एका व्यक्तीचा खुन झाल्याची घटना दि. १२ मार्च रोजी घडली होती. या घटनेतील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून संबंधितावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असतानाच या घटनेशी जामगाव चे सरपंच राधेश्याम धस यांचा कसलाही संबंध नसताना काही फेसबुक पेजवर त्यांच्या बाबत मानहानीकारक मजकूर टाकून बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याने सरपंच धस यांनी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे. याबाबत पोलिसांना दिलेल्या तक्रार अर्जात सरपंच राधेशाम धस म्हटले आहे की, दि. १३/०३/२०२५ रोजी दुपारी ०१:४० वाजता मला भाऊसाहेब मुरलीधर माने रा. मुर्शदपुर ता. आष्टी, जि. बीड यांचा मो.क. ७०८३२९१०१० या क्रमांकावरून माझा मोबाईल क्र. ७७०९९९१४१४ यावर फोन आला याने मला सांगितले की,स्टोरी डॉट कॉम व 'राजकारण महाराष्ट्राचे' या दोन नावाच्या फेसबुक पेज वरुन बीड ब्रेकींग सुरेश धसांच्या जामगावातील बेपत्ता धनंजय रणसिह यांचा मृतदेह सापडला, ३० हजारांच्या वादातून काटा काढल्याची माहिती, धसांचे पुतणे जामगावचे सरपंच, आणि आरोपी अज्ञात अश्या आशयाचा मजकूर पोस्ट करण्यात आला आहे.याची मी शहानिशा केल्यानंतर सदरील पोस्ट मुळे माझी समाजामध्ये खुप बदनामी झालेली आहे.तसेच माझे हॉटेल व्यवसाय असून या फेसबुक पेजवरील पोस्टमुळे माझ्याविषयी नाहक लोकांचे मनात भिती निर्माण झाल्याने माझे हॉटेलचे आर्थिक नुकसान देखील झाले आहे. गुरुवारी दिवसभर मला प्रचंड मानसिक त्रास झाला आहे.सदरची पोस्ट जाणीवपुर्वक मला मानसिक त्रास व्हावा व माझी लोकप्रीयता

▶▶ उर्वरित पान २ वर

# तेलगाव बस स्थानकात महिला प्रवाशाचे मंगळसूत्र चोरी, प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

### पोलीस आणि एसटी प्रशासनाचे दुर्लक्ष, महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारुर तालुक्यातील तेलगाव बस स्थानकात बसमध्ये चढत असतान एका महिला प्रवाशाचे मंगळसूत्र चोरीला गेल्याची घटना घडल आहे. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल आहे.

तेलगाव बस स्थानक हे बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे बस स्थानक असून, परळी, माजलगाव, वडवणी आणि धारूर या चार तालुक्यांचे मध्यवर्ती ठिकाण आहे. या बस स्थानकावरून लांब पल्ल्याच्या बसची नियमित वाहतूक सुरू असते. त्यामुळे येथे प्रवाशांची नेहमीच मोठी गर्दी असते. मात्र, एवढी वर्दळ असूनह या ठिकाणी एकही पोलीस कर्मचारी कधीही दिसून येत नाही. (दिनांक ११ मार्च) माजलगाव-चिपळूण बसमध्ये चढण्यासाठ प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. या गर्दीचा फायदा घेऊन एक चोरट्याने एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरून



पळ काढला. महिला बसमध्ये गेल्यानंतर तिच्या लक्षात आले. तिने आरडाओरड केल्यानंतर बस काही वेळ थांबवण्यात आली. मात्र, चोरट्याचा काही पत्ता लागला नाही. तेलगाव बस स्थानकात अशा घटना वारंवार घडत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वीही बस स्थानकात अनेक चोऱ्यांच्या घटना घडल्या आहे बस स्थानकात चोरट्यांचा सतत वावर असतो. मात्र, पोलीस प्रशासन आणि एसटी महामंडळ याकडे लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी महिला आणि शाळकरी मुलींची सतत ये-जा असते. त्यामुळे येथे पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. मात्र, पोलीस यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत आहे. तसेच बस स्थानकातील प्रवाशांची गैरसोय होऊ नये किंवा काही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाने सतर्क राहणे आवश्यक आहे. मात्र, तेलगाव पोलीस आणि एसटी महामंडळाचे अधिकारी या बाबतीत गंभीर दिसत नाहीत. त्यामुळे अशा घटना रोखायच्या असतील, तर बस स्थानकामध्ये कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

